म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. २६०
१९५५०



# जागृत जगन्नाथ


## जगन्नाथपुरी

१

REFBK 0011404
REFBK-0011404

राष्ट्र[illegible] के
भारत दर्शन

# जागृत जगन्नाथ




REFBK-0011404

भारतांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७..२२२ दि २५-५-६५
२०० आनंदयात्री





वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई २

श्री : २५०

© १९६०
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई

आवृत्ति पहिली : १९६०

किंमत ८० नये पैसे

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २



मुद्रक :
ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८, नारायण पेठ,
पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११४०४
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

कोणत्याहि सार्वजनिक स्वरूपाच्या वा लोककल्याणाच्या पवित्र कार्याला ' जगन्नाथाचा रथ ' म्हणण्याची प्रथा आहे. असें कार्य पार पाडतांना कोणतीहि स्वार्थबुद्धि न बाळगतां, कसल्याहि भेदभावनेचा विचार न करतां, तनमनधनेंकरून प्रत्येकानें आपापला अल्पस्वल्प वांटा उचलावा, अशी अपेक्षा असते. अर्थात् हें सहकार्य ज्यानें त्यानें आपल्या कुवतीनुसार द्यावयाचें असतें आणि त्या सहकार्यामागें उत्कटपणा आणि प्रामाणिकपणा असेल तर त्या अल्पस्वल्प सहकार्याचें मोलहि मोठें मानावयास हवें. " एकमेकां साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥ " हीच खरी त्यामागची प्रेरणा असावयास हवी.

अशा कार्याला जेव्हां आपण ' जगन्नाथाचा रथ ' असें म्हणतों आणि लोकांच्या सद्भावनेला आवाहन करतों, तेव्हां आपणांसमोर जगन्नाथपुरीच्या रथयात्रेचा आदर्श असतो. जगन्नाथाच्या वार्षिक रथयात्रेंत सहस्रावधि यात्रेकरू जमतात आणि जगन्नाथाचा प्रचंड रथ

आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥

ओढण्यासाठीं पुढें होतात. गांवांतील मुख्य मंदिरापासून गांवाबाहेरच्या मंदिरापर्यंत तो रथ ओढीत नेण्यासाठीं प्रत्येक जण हातभार लावतो. रथाच्या दोरांना हात देऊन आपले अल्पस्वल्प श्रम जगन्नाथाच्या सेवेंत रुजू करण्यासाठीं प्रत्येकाला तेथें ओढ वाटते आणि तशी संधि मिळालेला यात्रिक स्वत:ला कृतार्थ मानतो.

हीच प्रेरणा आपल्या सामाजिक जीवनांत अवतरावी आणि प्रत्येक पवित्र कार्यासाठीं प्रत्येकानें उत्कट सहकार द्यावा, याच भावनेनें लोक-कल्याणाच्या कार्याला आपण ‘ जगन्नाथाचा रथ ’ म्हणून संबोधतों. या प्रेरणेची गंगा ज्या जगन्नाथाच्या चरणांतून झरत आहे, त्या जगन्नाथाचें निवासस्थान असलेलें जगन्नाथपुरी हें विख्यात क्षेत्र ओरिसा प्रांतांत पूर्व-सागराच्या तीरावर आहे. सध्यां जगन्नाथपुरी हें स्थान ‘पुरी’ या संक्षिप्त नांवानें प्रसिद्ध असून, तें पुरी जिल्ह्याचें ठाणें आहे. जगन्नाथपुरीला श्रीक्षेत्र, पुरुषोत्तमक्षेत्र, पुरुषोत्तमपुरी, शंखक्षेत्र अशींहि नांवें आहेत. पश्चिमेस लोकनाथमंदिर, पूर्वेस बालेश्वरमंदिर, दक्षिणेस स्वर्गद्वार आणि ईशान्येस मटियाप्रवाह — अशा चतु:सीमांनीं युक्त असलेल्या या क्षेत्रभूमीचा आकार शंखासारखा आहे. श्रीविष्णूच्या चार आयुधांपैकीं शंख या आयुधाचें क्षेत्र म्हणून जगन्नाथपुरीचें महत्त्व आहे. भारतांतील चार पवित्र धामांपैकीं एक धाम म्हणूनहि जगन्नाथपुरीचा तीर्थमहिमा प्राचीन काळापासून चालत आला आहे.

## पूर्वसमुद्राच्या तीरावर :


जगन्नाथपुरीचे दोन भाग पडलेले आहेत : समुद्रकांठचा वाळुखंड आणि प्रत्यक्ष गांवाचा भाग. वाळुखंडांतहि स्वर्गद्वार आणि चक्रतीर्थ या

दोन पवित्र स्थळांच्या मध्यभागीं वस्ती आहेच. गांवांत उत्तरभारतांतील प्रसिद्ध क्षेत्रांतल्यासारखीच खूप अस्वच्छता आहे. येथील सागर मात्र उगवत्या सूर्याच्या स्वागतासाठीं नित्य हेलावत असतो. सूर्योदयाच्या वेळीं पूर्वसागराच्या तीरावर उभें राहून उगवत्या सूर्याला भक्तीचे अर्घ्य अर्पण करण्यांत एक निराळाच आनंद अनुभवास येतो. तप्तकांचनाप्रमाणें कांतिमान् असलेल्या सूर्याचे सोनेरी किरण जेव्हां भरतीच्या लाटांवर नाचूं लागतात, तेव्हां तें दृश्य पाहून यात्रिकाचें हृदयहि आनंदाच्या सुवर्णलहरींनीं ओसंडूं लागतें. अशा वेळीं यात्रिकाच्या चित्तवृत्ति नकळतच भक्तिप्रवण बनतात आणि वाटूं लागतें कीं, प्रत्यक्ष प्रकाशप्रभु सूर्य नित्य आपल्या सुवर्णकरांनीं ज्याचें प्रथम दर्शन घेतो आणि पूर्वसागर नित्य ज्याचे चरण धूत असतो, त्या जगन्नाथाच्या चरणांचा स्पर्श किती संजीवक असेल !

## इतिहासाचा कानोसा :

आदिवासी गिरिजनांनीं व्यापलेल्या या प्रदेशांत इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकांत आर्यांनीं वसाहत केली. इ. स. पूर्वी २६१ मध्यें कलिंग देश अशोकाच्या साम्राज्यांत समाविष्ट झाला. कलिंग-युद्धांतील भयंकर संहार पाहून अशोकाचें हृदयपरिवर्तन झालें आणि त्यानंतर त्यानें आपलें जीवन बुद्धधर्माच्या प्रसारासाठीं वेचलें, हा इतिहास प्रसिद्ध आहे. या प्रदेशांत अशोकाचे दोन शिलालेख अजूनहि त्याच्या स्मृति जागवीत आहेत. अशोकाच्या वेळीं कलिंगाच्या राज्यव्यवस्थेचें केंद्र भुवनेश्वरजवळील तोसली येथें होतें. इ. स. ६४० मध्यें प्रसिद्ध बौद्ध ज्ञानयात्रिक ह्युएन्त्सँग हा जगन्नाथपुरीस आला होता. इ. स. ४७४ ते ९५० या काळांत ओरिसांत केसरी घराण्याचें राज्य होतें. हें घराणें हिंदुधर्मानुयायी होतें. ओरिसांतील अनेक प्रसिद्ध मंदिरें केसरी घराण्याच्या राज्यकाळांत बांधलीं गेलीं. भौम, केसरी, गंग इत्यादि ओरिसाचे राज्य-कर्ते अन्यप्रांतीय होते. इ. स. १४३८ मध्यें गंग घराण्याचें उन्मूलन करून सूर्यवंशी राजा

कपिलेन्द्रदेव राज्यावर आला. सूर्यवंशी राजे खास उत्कलभूमीचे पुत्र होते; त्यांच्या राज्यकालांत ओरिसांत सांस्कृतिक उत्थान घडून आलें. उडिया साहित्याचा उदयहि त्यांच्याच राज्यकालांत झाला. या घराण्यांत कपिलेन्द्र, पुरुषोत्तम, प्रतापरुद्र यांसारखे ख्यातनाम राजे होऊन गेले.



उत्तरभारतांत मुसलमानांची सत्ता दृढमूल झालेली असतांनाहि सोळाव्या शतकापर्यंत ओरिसाच्या हिंदु राज्यकर्त्यांनीं मुसलमानी आक्रमणाचा प्रतिकार केला. सोळाव्या शतकांत ओरिसा अफगाणांच्या ताब्यांत गेला. इ. स. १५०९ मध्यें बंगालचा सुभेदार हुसेन-शहा यानें पुरीच्या जगन्नाथमंदिरावर पहिला हल्ला चढविला. त्यानंतर कालापहाड या बाटग्या मुसलमानाची धाड आली. इ. स. १५९८ पासून १७४२ पर्यंत मुसलमानांनीं अनेक हल्ले केले. इ. स. १७६८ मध्यें ओरिसावर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित झाल्यावर हे हल्ले थांबले. मराठ्यांच्यानंतर इ. स. १८०३ मध्यें इंग्रज आले.

## क्षेत्र-कथांची विविधता :

स्कंद पुराणाच्या उत्कल खंडांत जगन्नाथाच्या उद्भवाची एक अद्भुत कथा दिलेली आहे : अतिप्राचीन काळीं या क्षेत्राच्या ठिकाणीं एक मोठें अरण्य होतें. त्या अरण्यांत मध्यभागीं एक टेकडी होती. त्या टेकडीचें नांव नीलाचल. नीलाचलावर कल्पवृक्षाच्या छायेंत श्रीविष्णूची एक अत्यंत सुंदर मूर्ति होती. त्या विष्णुमूर्तीला 'नीलमाधव' म्हणत असत. त्या विष्णुमूर्तीच्या सौंदर्याची कीर्ति माळव्याचा राजा इंद्रद्युम्न याला समजली. ती मूर्ति आपल्या राजधानींत असावी, या हेतूनें त्यानें विद्यापति नांवाच्या ब्राह्मणाला मूर्तीच्या शोधास्तव पाठविलें. विद्यापति नीलाचला-जवळच्या शबरांच्या जंगली वस्तींत आला. तेथें तो विश्वावसु नांवाच्या शबराच्या घरीं उतरला. हा विश्वावसु नित्यनियमानें पूजासाहित्य घेऊन जंगलांत जात असे. तो कुठें जातो आणि कोणत्या देवाची पूजा करतो, हें एक गूढच होतें.

विद्यापतीनें या गूढाचा शोध लावण्याचें ठरविलें. विश्वावसु तर माहिती द्यावयास तयार नव्हता. मग काय करायचें ? परंतु त्याला फार काळ चिंतेंत रहावें लागलें नाहीं. विश्वावसूची एकुलती एक मुलगी विद्यापतीच्या रूपगुणांवर भाळली होती. तिच्या स्नेहाचा विद्यापतीला उपयोग झाला. तो तिला म्हणाला :

" तुमच्या त्या आवडत्या देवाचं मला नाहीं का दर्शन घडविणार ? आवडत्या पाहुण्याला आवडत्या गोष्टी दाखवल्याच पाहिजेत. "

शबरकन्येनें रात्रीं पित्याजवळ हट्ट धरला कीं, उद्यां आपल्या पाहुण्यांना देवदर्शनाला घेऊन जा. विश्वावसु या गोष्टीला तयार होईना; परंतु लाडक्या मुलीचा हट्टहि त्याला मोडवेना. दुसऱ्या दिवशीं त्यानें विद्यापतीला बरोबर घेतलें; परंतु घरांतून निघण्यापूर्वीं त्यानें त्याचे डोळे पट्टीनें घट्ट बांधले होते. हेतु हा कीं, मूर्ति कुठें आहे, तिकडे जाण्याचा रस्ता कोणता, हें विद्यापतीला समजूं नये. अर्थात् विद्यापतीची बुद्धि सवाई होती. विश्वावसूच्या खांद्यावर हात ठेवून चालतांना तो दुसऱ्या हातानें आपल्या झोळींतील मोहरीचें बीं रस्त्याच्या कडेनें पेरीत होता. नीलाचलावरील कल्पवृक्षाजवळ गेल्यावर विश्वावसूनें विद्यापतीचे डोळे सोडले. कल्पवृक्षाच्या छायेंत शोभणारी ती नीलमाधवाची मनोहर मूर्ति पाहून विद्यापति मंत्रमुग्ध झाला. अवन्तीचें विष्णुमंदिर या मूर्तीनें कसें शोभेल, याचें कल्पनाचित्र त्याच्या मनांत तरळूं लागलें.



विश्वावसूनें पट्टी बांधूनच विद्यापतीला घरीं आणलें. आतां विद्यापतीचें कार्य जवळ जवळ सफल झालें होतें. तो शबराचा आणि शबरकन्येचा निरोप घेऊन अवन्तीस निघून आला. राजाला त्यानें सर्व वृत्त सांगितलें. राजा लगेच सर्व परिवार[1] बरोबर घेऊन नीलाचलावर आला. विश्वावसूच्या घरापासून ज्या रस्त्यावर मोहरीचीं रोपें उगवलीं होतीं, त्या रस्त्यानें विद्यापतीनें राजाला इष्ट ठिकाणीं नेलें; परंतु राजा तेथें जातांच नीलमाधव अदृश्य झाला. राजाचा अहंकार आणि कीर्तिलालसा पाहून नीलमाधवानें त्याला दर्शन दिलें नाहीं. राजा

हताश होऊन देवाची करुणा भाकूं लागला. त्यानंतर आकाशवाणी झाली : “ राजा, तुझ्या मनांत माझ्याविषयींची शुद्ध भक्ति नाहीं. तूं केवळ माझ्या मूर्तीच्या बाह्य सौंदर्यावर लोभावला होतास, म्हणून मीं तुला दर्शन दिलें नाहीं. तूं जर पुण्यकर्मांनीं तुझें हृदय शुद्ध केलेंस, तर मी तुला दर्शन देईन — परंतु तें नीलमाधवाच्या सुंदर मूर्तीचें नव्हे, तर लाकडी ओंडक्याच्या रूपानें ! ”



पश्चात्तप्त राजानें देवदर्शनासाठीं तप आरंभिलें. राजाचें हृदय शुद्ध झाल्यावर त्याला सागरकिनाऱ्यावर एक लाकडाचा ओंडका वाहत येतांना दिसला. आकाशवाणीच्या आदेशा-प्रमाणें हेंच तें देवाचें लाकडी रूप असावें, अशी खात्री पटल्यावर राजानें तो ओंडका वाजत गाजत किनाऱ्यावर आणला आणि तेथें त्याची प्रतिष्ठापना केली. नंतर राजानें देशांतील चतुर कारागिरांना निमंत्रण देऊन तेथें आणलें आणि त्या ओंडक्यांतून जगन्नाथाची सुंदर मूर्ति तयार करण्याची आज्ञा त्यांना दिली. अनेकांनीं प्रयत्न केला; परंतु कुणालाच यश येईना. कारण ओंडक्यावर पटाशी चालवायला सुरुवात करतांच पटाशीचेच तुकडे तुकडे होऊन जायचे. अखेर एक वृद्ध सुतार पुढें आला आणि राजाला विनयपूर्वक म्हणाला :

“ महाराज, मी एकवीस दिवसांत तुम्हांस हवी तशी मूर्ति घडवून देतों. परंतु मी ज्या बंदिस्त खोलींत काम करीत राहीन, त्या खोलीचें दार एकवीस दिवसपर्यंत उघडायचें नाहीं. ”


राजानें त्याची अट मान्य केली. काम सुरू होऊन दोन आठवडे लोटले. राजाची उत्सुकता शिगेला पोहोंचली. त्या बंद खोलींतून माणसाची चाहूल जाणवत नव्हती, हत्यारांचे आवाजहि येत नव्हते. राजाला रहावेना. त्यानें मुदत भरण्यापूर्वीच खोलीचें दार उघडलें. आंत पहातो तों तेथें सुतार नाहीं, परंतु लाकडाच्या तीन मूर्ति मात्र अर्धवट अवस्थेंत पडलेल्या आहेत. राजाला आपल्या उतावीळपणाचा पश्चात्ताप झाला. निरुपायानें त्या अपूर्ण मूर्तींचीच देवळांत स्थापना करण्यांत आली. त्या तीन मूर्ति म्हणजे श्रीकृष्ण, बलराम आणि सुभद्रा.

जगन्नाथाच्या उद्भवाची आणखीहि एक कथा आहे : भारतीय युद्धानंतर जेव्हां श्रीकृष्णानें देहत्याग केला, तेव्हां त्याचा नाभिप्रदेश चितेंत जळेना. मग तेवढा भाग समुद्रांत सोडण्यांत आला. तो भाग वाहत वाहत नीलाचलाजवळील किनाऱ्यावर आला. तेथें विष्णु-दर्शनासाठीं राजा इंद्रद्युम्न तप आचरीत होता. त्याला स्वप्नांत असा दृष्टान्त झाला कीं, “ राजा, हा माझ्या देहाचा अवशेष तूं लाकडी मूर्तींत बसव आणि त्या मूर्तीची मंदिरांत स्थापना करून तिची उपासना करीत रहा. ” राजानें त्या आदेशाप्रमाणें सर्व कांहीं भक्तिपूर्वक पार पाडलें.

**संस्कृतीचीं स्थित्यन्तरें :**

जगन्नाथाच्या उद्भवाच्या या अद्भुत कथांवरून असें वाटतें कीं, पुरीचा हा जगन्नाथ मूलतः वैदिक परंपरेंतला देव नसावा. पहिल्या कथे-वरून हें स्पष्ट होतें कीं, तो प्रथम शबरांचा ( भिल्लांचा ) देव होता. मूर्तीचें ओबडधोबड स्वरूप, भाताच्या प्रसादाची पद्धति, देवाच्या दर्शनास सर्वांना असलेली मोकळीक आणि उत्सवांत आदिवासींना मिळणारा मान या गोष्टींवरून असें निश्चित वाटतें कीं, जगन्नाथ हा मूलतः आदिवासींचाच देव होता.

ही आदिवासींची देवता नंतर बौद्धांच्या प्रभावाखालीं गेली असावी. दुसऱ्या कथेंत सांगितलेली



जगन्नाथ-मंदिर

श्रीकृष्णाच्या देहाच्या अवशेषाची पूजा-पद्धति वैदिक परंपरेंत बसणारी नाहीं. वंदनीय विभूतींच्या मृत देहाचे अवशेष सुरक्षित ठेवून त्यांची पूजा करण्याची प्रथा बौद्धधर्मांत प्रचलित आहे. भगवान् बुद्धाचे आणि त्याच्या श्रेष्ठ अनुयायांचे अवशेष भारतांत निर-निराळ्या बौद्ध क्षेत्रांत आजहि पूजिले जातात. यावरून असें वाटतें कीं, जगन्नाथपुरीची देवता कांहीं काळ बौद्ध प्रभावाखालीं असावी आणि तिथें वैष्णव परंपरेचा पगडा बसल्यानंतर देवतेच्या माहात्म्याविषयींच्या नव्या कथा रचल्या गेल्या असाव्या. फा-हैन हा चिनी प्रवासी पांचव्या शतकामध्यें य ठिकाणीं आला, तेव्हां त्याला हें स्थान बौद्ध क्षेत्राच्या स्वरूपांतच आढळलें. भगवान् बुद्धाच्या दांताची येथें पूजा होत असे आणि दरवर्षी त्या दांताची रथांतून मोठी मिरवणूक निघत असे. सध्यां चालू असलेली रथयात्रा त्या मूळ दंत-यात्रेचीच वैष्णव आवृत्ति असावी. ओरिसांतील एक श्रेष्ठ वैष्णव कवि श्रीसरलदास यानें आपल्या महाभारतावरील ग्रंथांत म्हटलें कीं, “ जेव्हां राजा इंद्रद्युम्नानें दार उघडलें, तेव्हां त्याला विष्णूच्या हस्तपादविहीन अशा तीन मूर्ति आढळल्या. त्यांच्याभोंवतीं भगवान् बुद्धाचें तेजोवलय झळाळत होतें. त्यांना नाक, कान आणि डोळे नव्हते. त्यांना बोटें नव्हतीं. भगवान् बुद्धच त्या तीन रेखांच्या रूपानें प्रगट झाला होता.”

अलीकडच्या काळांतील मराठी संतकवि श्रीदासगणू यांनीं आपल्या ‘भक्तिसारामृत’ या ग्रंथांत पुरीच्या जगन्नाथाच्या स्वरूपाचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे :

**भगवान जेव्हां बौद्ध झाले । तेव्हां जगन्नाथीं आले ।**
**कुरूपपण स्वीकारिलें । बळेंच हरीनें ये ठायीं ॥**

जगदीशाची काष्ठमूर्ती । ओबडधोबड असे अती ।
ज्या पहातां चित्तवृत्ति । वरी तिटकारा तात्काळ ॥
पाहूनिया त्या मूर्तीला । जनसमुदाय बोलता झाला ।
हा भानामतीच्या खेळांतला । वेताळ वाटे निःसंशय
ऐसें मत बळावतां । वरेंच वाटलें जगन्नाथा ।
म्हणे, माझ्या दर्शनाकरितां । कोणी न आतां येतील ॥
तें श्रीव्यासें जाणून । झाले उडियांत अवतीर्ण ।
जगदीशाचें वेताळपण । निवटावयाकारणें ॥

— 'भक्तिसारामृत', अ. ४६.

या सर्व कथांवरून असें दिसतें कीं, जगन्नाथाच्या या क्षेत्र-माहात्म्यांत आदिवासी, बौद्ध आणि वैष्णव अशा तीन परंपरांचा संमिश्र प्रभाव आहे. श्रीकृष्ण, बलराम आणि सुभद्रा असें देवता-मंडळ हिंदु देवतांच्या समूहांत अन्यत्र कोठेंहि नाहीं. कृष्णभक्तीच्या क्षेत्रांत कृष्णाबरोबर राधा आढळते आणि विष्णूबरोबर लक्ष्मी आढळते. विष्णु-लक्षी, राम-सीता, कृष्ण-राधा, विठ्ठल-रुक्मिणी अशा जोड्या आढळतात. राम-सीतेच्या मूर्तींबरोबर लक्ष्मणाहि असतो. परंतु कृष्ण-बलरामाबरोबर कृष्ण-सखी राधा वा कृष्णपत्नी रुक्मिणी यांऐवजीं कृष्ण-भगिनी सुभद्रा इथें कशी आली, तें कळत नाहीं. सुभद्रेला देवता म्हणून मान्यता मिळाल्याचा वा तिची भक्ति सुरू झाल्याचा कुठेंहि उल्लेख आढळत नाहीं. जगन्नाथपुरींत याविषयीं प्रचलित असलेली एक दंतकथा अशी आहे :

द्वापरयुगांत एकदां कृष्णाच्या राण्या रोहिणीच्या भवनांत गेल्या आणि त्यांनीं गोपी-कृष्णाच्या गोकुळांतील लीला सांगण्याविषयीं रोहिणीला आग्रह केला. रोहिणीनें खूप टाळाटाळ केली; परंतु त्या हट्ट सोडीनात. तिथें सुभद्राहि होती. तिच्या देखत व्रजलीलांचें वर्णन करणें रोहिणीला इष्ट वाटेना. तिनें सुभद्रेला दाराबाहेर उभें राहण्यास सांगितलें आणि ' कुणाला आंत सोडूं नकोस ' असें बजावलें. योगायोगानें त्याच वेळीं बाहेरून श्रीकृष्ण-बलराम आले. सुभद्रेनें त्यांना दोन्ही हातांनीं तिथेंच अडवलें. आंत बंद दाराआड व्रजलीलांचें वर्णन चाललें होतें. बाहेरून हीं तीन भावंडें ऐकत होतीं.





मराठी ग्रंथ [illegible], ठाणे. [illegible]
अनुक्रम 39892 ...... दि: 25-5-81
[illegible]

तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा।
पूजा केली होय अपारा। तोषालागी॥

तें वर्णन अस्पष्ट स्वरूपांत ऐकून त्या तिघांच्या मुखांवर आनंदाची छाया पसरली होती. इतक्यांत तिथें महर्षि नारद आले. त्या तीन भावंडांच्या त्या हर्षभरित मूर्ति पाहून नारदमुनींना अत्यंत समाधान प्राप्त झालें. त्यांनीं विनंती केली :

"तुमचें हें प्रसन्न रूप असेंच सदैव पहात रहावें, अशी इच्छा आहे. तुम्ही तिघेंहि अशींच उभीं रहा."

नारदमुनींच्या या विनंतीला मान देऊन श्रीकृष्णानें आश्वासन दिलें कीं, "कलियुगांत लाकडी मूर्तींच्या स्वरूपांत आम्ही तिघेंहि एकत्र नांदून भक्तांच्या डोळ्यांचें पारणें फेडूं."

या कथेंतील स्पष्टीकरण अर्थातच भक्त-भाविकांच्या कल्पनेंतून निर्माण झालेलें आहे. वैष्णवांच्या कल्पनेनुसार पुरीच्या तीन मूर्ति म्हणजे श्रीकृष्ण-बलराम-सुभद्रा होत, तर शैवांच्या कल्पनेप्रमाणें तें शिवाच्या त्रिशूळाचें प्रतीक आहे. बौद्ध लोक तें बुद्ध-धर्म-संघ या त्रिरत्नांचें प्रतीक मानतात.

**मंदिर आणि मूर्ति :**

जगन्नाथाचें मंदिर गांवाच्या मध्यभागीं उंचवट्यावर आहे. या उंचवट्याला 'नीलाचल' असें म्हणतात. हें मंदिर क्षेत्राच्या कीर्तीला साजेसें विशाल आणि भव्य आहे. मंदिराभोंवतीं दुहेरी कोट आहे. कोटाची उंची २० फूट असून मंदिर-परिसराचें क्षेत्रफळ ६५२×६३० चौरस फूट आहे. मंदिर-परिसरांत जगन्नाथमंदिरासह एकूण १२० मंदिरांचा समूह आहे. या मंदिरांच्या समूहांत जगन्नाथाचें मंदिर 'निज-मंदिर' म्हणून ओळखलें जातें. मंदिराभोंवतालच्या कोटाला चार द्वारें


आहेत : पूर्वेकडील सिंहद्वार, दक्षिणेकडील अश्वद्वार, पश्चिमेकडील व्याघ्रद्वार आणि उत्तरेकडील हस्तिद्वार. पूर्वेकडील सिंहद्वार हेंच जगन्नाथाचें महाद्वार असून त्याच्या सम्मुख कोणार्कहून आणलेला 'अरुणस्तंभ' उभा आहे. या ३५ फूट उंचीच्या काळ्या संगमरवरी स्तंभावर गरुडमूर्ति असल्यामुळें त्याला 'गरुडस्तंभ' असेंहि म्हणतात.

जगन्नाथाचें भव्य मंदिर २० फूट उंचीच्या चौथऱ्यावर उभें आहे. या मंदिराचे एकूण चार भाग आहेत. श्रीमंदिर ( गाभारा ), जगमोहन-मंदिर, नटमंदिर अथवा मुखशाला आणि भोगमंडप. श्रीमंदिरांत देवाच्या मूर्ति आहेत. जगमोहनमंदिरांत दर्शनासाठीं यात्रिक उभे राहतात. नटमंदिरांत देवापुढें गाण्या-नाचण्याची व्यवस्था आहे आणि भोगमंडपांत समर्पणांची व्यवस्था आहे. श्रीमंदिर, जगमोहनमंदिर आणि नटमंदिर या तीन भागांवर उतरतीं तीन शिखरें आहेत. श्रीमंदिरावरील शिखराची उंची १९२ फूट असून त्याचा पाया ८० चौरस फूट आहे. या उत्तुंग शिखरावर प्रचंड सुदर्शनचक्र असून देवाचा ध्वज सदैव फडफडत असतो. या शिखरावरील चक्राचें दर्शन जेवढ्या दूरवरच्या भागांतून होतें, तेवढ्या सर्व विस्तृत भूमीस 'जगन्नाथक्षेत्र' मानतात. श्रीमंदिरावरील शिखर वर्तुळाकार गोपुरासारखें आहे. पुढील दोन शिखरें उतरत्या चौकोनी थरांनीं बनलेलीं असून वर घुमट आहेत.

जगन्नाथमंदिराची रचना ओरिसा शिल्प-पद्धतीनें झालेली आहे. विशालता आणि भव्यता यांबरोबरच कोरीव कामांची गर्दी हें या पद्धतीचें वैशिष्ट्य आहे. जगन्नाथमंदिर चहूं बाजूंनीं कोरीव कामानें गच्च भरलेलें आहे. मंदिराचा आंतला भाग मात्र साधा

आहे. नटमंदिरांत मात्र कोरीव कामाऐवजीं कांहीं चित्रें काढलेलीं आहेत. बाहेरच्या बाजूनें केलेल्या कोरीव कामांत अनेक शृंगारिक आणि लैंगिक दृश्यें कोरलेलीं आहेत. ओरिसांतील कोणार्क आणि भुवनेश्वर येथील प्रसिद्ध मंदिरांवरहि अशींच दृश्यें कोरलेलीं आहेत. अशीं अश्लील चित्रें देवाच्या मंदिरावर कोरण्याचें प्रयोजन काय, तें मात्र कळत नाहीं.

सध्यांचें हें मंदिर कुणीं बांधलें, याविषयीं दोन मतें आहेत : कुणी म्हणतात कीं, तें अनन्तवर्मन् चोडगंग या राजानें इ. स. ११०० मध्यें



बलराम, सुभद्रा व जगन्नाथ

बांधलें. हा पूर्वीय गंग घराण्यांतील राजा इ. स. १०७८ ते ११४८ या कालांत गंगामुखापासून गोदामुखापर्यंतच्या प्रदेशावर राज्य करीत होता. तो धर्म आणि संस्कृत विद्या यांचा मोठा आश्रयदाता होता. दुसऱ्या मताप्रमाणें या मंदिराची उभारणी अनंग भीमदेव नांवाच्या राजानें केली. यासंबंधीं अशी आख्यायिका प्रचलित आहे कीं, अनंग भीमदेवाच्या हातून चुकून ब्रह्महत्या घडली. त्या पापाचें प्रायश्चित्त घेण्यासाठीं म्हणून त्यानें सात लक्ष रुपये खर्च करून इ. स. ११७४ ते ११९८ या चौदा वर्षांत हें प्रचंड मंदिर उभारलें.

या मंदिराचें वार्षिक उत्पन्नंहि प्रचंड आहे. देणग्या आणि इनामें यांपासून एक लाख रुपये मिळतात आणि यात्रिकांचें समर्पणद्रव्य पाऊण लाखावर जमा होतें. या देवस्थानाविषयीं लोकमानसांत किती श्रद्धा आहे, याचें एक उदाहरण म्हणजे पंजाबचा महाराजा रणजितसिंह यानें मरतांना, ' जगंप्रसिद्ध कोहिनूर हिरा जगन्नाथाला अर्पण करावा ' अशी इच्छा व्यक्त केली होती. परंतु त्याच्या पश्चात् त्याच्या मुलानें पित्याची इच्छा पूर्ण केली नांहीं.

गाभाऱ्यांत आपण देवासमोर उभे राहिलों म्हणजे आपणांस समोर १६ फूट लांब आणि ६ फूट उंच अशी वेदी दिसते. या वेदीला 'रत्नवेदी' म्हणतात. रत्नवेदीवर आपल्या उजव्या बाजूस कृष्ण, डाव्या बाजूस बलराम आणि मध्यें सुभद्रा अशा तीन मूर्ति ओळींनें दिसतात. या मूर्ति लांकडाच्या आहेत. या तीनहि मूर्तींना हात-पाय वगैरे अवयव नाहींत. केवळ मुखाचा भाग ओबडधोबड कोरलेला असतो आणि आदिवासी पद्धतीनें रंगविलेला असतो. जगन्नाथाची मूर्ति ५ फूट उंचीची, बलरामाची मूर्ति ६ फूट उंचीची आणि सुभद्रेची मूर्ति ४ फूट उंचीची आहे. बलरामाच्या मूर्तीचा रंग पांढरा, जगन्नाथाच्या मूर्तीचा रंग काळा, आणि सुभद्रेच्या मूर्तीचा रंग पिवळा आहे. या तीनहि मूर्ति चित्र-विचित्र रंगांच्या वस्त्रालंकारांनीं नटवलेल्या असतात. श्रीकृष्ण ( जगन्नाथ ) आणि बलराम यांच्या मूर्तींना वेष चढवितांना दोन्ही बाजूंना वस्त्र सोडून हातांचा आभास निर्माण करतात. वेदीवर एका बाजूस सहा फूट व्यासाचें सुदर्शन चक्र आहे. आंत नीलमाधव, लक्ष्मी आणि सरस्वती यांच्या लहान मूर्ति आहेत.


या तीनहि मूर्ति दर सतरा वर्षांनीं नव्या बनवतात. आकाशांतील ग्रहांची विशिष्ट स्थिति असतांना त्या मूर्ति बनवतात. अशी स्थिति दर सतरा वर्षांनीं एकदां येते. मूर्ति बनवण्यासाठीं निंबाचें लांकूड वापरतात. नव्या मूर्ति बनवतांना जुन्या मूर्तींचे कांहीं अंश नव्या मूर्तींत ठेवतात. नव्या मूर्ति बनविण्याच्या वेळीं मोठा उत्सव होतो.

या उत्सवाला 'नवकलेवर' ( नवीन देह ) महोत्सव म्हणतात. या निमित्तानें ज्या निंबाचें लाकूड निवडतात, त्या निंबाचीं कांहीं वैशिष्ट्यें

पाहिलीं जातात. त्या निंबाच्या झाडावर दुसऱ्या कुठल्याहि झाडाची सावली पडलेली असतां कामा नये; त्या झाडावर पक्ष्यांचीं घरटीं नसावींत; त्याच्या खोडांत सापांचीं बिळें असावींत आणि त्याच्या सालीआड शंख-चक्रांच्या खुणा असाव्यात. अशा वैशिष्ट्यांनीं युक्त असलेल्या निंबाच्या लाकडांच्या मूर्ति बनविण्याचें कामहि परंपरेनें चालत आलेल्या विवक्षित घराण्यांतील सुताराकडूनच करून घेतलें जातें.

## जगन्नाथाचा प्रसाद :

जगन्नाथाचें दर्शन सर्वांना मुक्तपणें घेतां येतें. दिवसांतून एका विवक्षित वेळीं मूर्तींच्या चरणांना स्पर्श करून दर्शन घेण्याची सोय असते. मंदिर-प्रवेश आणि मूर्ति-स्पर्श यांवर कसलेंहि बंधन नाहीं. जगन्नाथ हा खराखुरा जनता-जनार्दन आहे. त्याच्या पायांशीं सर्व जण सारखेच. त्याची सर्वांवर सारखी पांखर आहे.




रथयात्रा

देवाच्या नित्य पूजे-अर्चेची व्यवस्था एकाच ब्राह्मण घराण्याकडे चालत आलेली आहे. हें घराणें इंद्रद्युम्नाच्या वेळच्या विद्यापतीचें आहे, अशी लोकांची समजूत आहे. स्नान-यात्रा आणि रथयात्रा या काळांत पूजेची व्यवस्था 'दैत' नांवाच्या आदिवासी जमातींतील घराण्याकडे असते. रथयात्रेच्या वेळीं रथाच्या दोराला प्रथम स्पर्श करण्याचा मानहि या आदिवासींनाच आहे.

जगन्नाथाचा प्रसाद म्हणून येथें शिजविलेला भात असतो. हा भात रोज संध्याकाळीं लहान-मोठ्या मडक्यांतून विकत मिळतो. मंदिर-परिसरांतच ' प्रसादाचा बाजार ' असतो. भाताबरोबरच भाजी, तांदळाच्या भाकरी, शिजविलेली डाळ हे पदार्थहि प्रसाद म्हणून विकले जातात. तीन-चार आण्यांत दोन वेळां पुरेल एवढें अन्न 'प्रसाद' म्हणून विकत मिळूं शकतें. हे खरकटे पदार्थ घेतांना येथें सोवळ्या-ओवळ्याचा आणि श्रेष्ठ-कनिष्ठ जातीच्या अन्नग्रहणाचा प्रश्नच कुणासमोर नसतो. उपवासाच्या

दिवशींहि हा 'प्रसाद' भक्षण करण्यास हरकत नाहीं, अशी येथील समजूत आहे. आधुनिक प्रवृत्तीच्या मनाला हा खरकट्या पदार्थांचा बाजार ओंगळ आणि चमत्कारिक वाटेल; परंतु त्या प्रथेंत सामाजिक कर्मठपणावर भक्तीनें मिळविलेला विजय स्पष्ट दिसून येतो, एवढें मात्र निश्चित जाणवतें.

पुरीचा जगन्नाथ अनेक सांस्कृतिक स्थित्यंतरांतून प्रसिद्धि पावत आला आहे. आदिवासी शबरजन, बौद्ध आणि वैष्णव अशा विविध परंपरांच्या कल्पनांनीं जगन्नाथाचें महिमान वाढत आलें आहे. आज तें हिंदूंचें अत्यंत पवित्र दैवत बनलेलें आहे. आपल्याला अत्यंत श्रद्धेय वाटणाऱ्या देवतेची प्राचीनता वेदकाळापर्यंत भिडविण्याची आवश्यकता भाविक हिंदु मनाला वाटते. या प्रवृत्तीनुसार जगन्नाथाच्या उपासनेस उपयुक्त ठरणारा पुढील वेदमंत्र वापरला जातो :



**अदो यद्दा दारु प्लवते**
**सिन्धोः पारे अपूरुषम् ।**
**तदा रभस्व दुर्हणो**
**तेन गच्छ परस्तरम् ॥**

— ऋग्वेद, १०-१५५-३.

[ सायणाचार्यांनीं या ऋचेचा अर्थ पुरीच्या जगन्नाथाच्या उपासनेच्या दृष्टीनें लावला आहे. या ऋचेचा अर्थ त्यांच्या मतें असा आहे : " हे अविनाशी उपासका, समुद्रावरून वाहत आलेल्या लाकडांतून ज्याची मूर्ति घडविली आहे, त्या 'दारुब्रह्म' पुरुषोत्तमाची तूं उपासना कर आणि त्यायोगें परब्रह्माची प्राप्ति करून घे. " ]

**उत्सव आणि यात्रा :**

जगन्नाथपुरी हें भारतांतील एक प्रमुख क्षेत्र असल्यामुळें तेथें वर्षभर निरनिराळ्या दिनविशेषांच्या निमित्तानें उत्सव आणि यात्रा यांचा

सोहळा होत असतो. जगन्नाथ हें श्रीकृष्णाचेंच रूप आहे, अशी कल्पना असल्यामुळें येथील बहुतेक उत्सव कृष्ण-चरित्रांतील निरनिराळ्या प्रसंगांची स्मृति साजरी करणारे असतात. या उत्सव-यात्रांच्या निमित्तानें कृष्ण-जीवनाचा स्मृतिपट सारखा उलगडत राहतो आणि लोकांचीं मनें कृष्णभक्तीनें भारलीं जातात.



वैशाख शुक्ल तृतीयेपासून ज्येष्ठ कृष्ण अष्टमीपर्यंत येथें 'चन्दनयात्रा' असते. या वेळीं मदनमोहन, रामकृष्ण, लक्ष्मी-सरस्वती, पंचमहादेव ( नीलकंठेश्वर, मार्कंडेयेश्वर, लोकनाथ, कपालमोचन व जंभेश्वर ) यांच्या उत्सवमूर्ति चंदन-तलावावर नेतात आणि तेथें देवांच्या स्नानाचा नि नौकाविहाराचा समारंभ साजरा होतो. ज्येष्ठ शुक्ल एकादशीला मंदिरांत 'रुक्मिणीहरण-लीला' होते. ज्येष्ठी पौर्णिमेला श्रीजगन्नाथ-बलराम-सुभद्रा यांची स्नानयात्रा होते. या वेळीं तिन्ही मूर्ति स्नानमंडपांत नेऊन त्यांना एकशेंआठ जलकुंभांतून स्नान घालतात. नंतर जगन्नाथाला गणेशाचा वेश चढवितात. ( कारण पूर्वी जगन्नाथानें या दिवशीं एका भक्ताला गणेशरूपानें दर्शन दिलें होतें, असें म्हणतात. ) यानंतर पुढें पंधरा दिवसपर्यंत मंदिर बंद राहतें.

येथील सर्व उत्सव-यात्रांत 'रथयात्रा' अत्यंत प्रसिद्ध आहे. ही यात्रा आषाढ शुक्ल द्वितीयेला सुरू होते. ही रथयात्रा श्रीकृष्णाच्या मथुरागमनाची स्मृति साजरी करण्यासाठीं असते. द्वितीयेच्या दिवशीं श्रीजगन्नाथ-बलराम-सुभद्रा यांच्या मूर्ति शुभ वेळ पाहून सिंहद्वारानें बाहेर आणतात आणि प्रचंड रथांत बसवितात. तीन देवांचे तीन वेगवेगळे रथ असतात. जगन्नाथाचा रथ ४५ फूट उंचीचा आणि ३५ फूट चौकोनी घेराचा असतो. त्या रथाला ७ फूट व्यासाचीं सोळा चाकें असतात. बलराम आणि सुभद्रा यांचे रथ जगन्नाथाच्या रथाहून किंचित् लहान असतात. रथ ओढण्यासाठीं त्यांना प्रचंड दोर बांधतात आणि प्रत्येक रथ दोन-दोनशें यात्रिक ओढतात.

ही रथयात्रा ' बुरा दंडा ' रस्त्यानें निजमंदिराच्या उत्तरेस मैल-दीड मैलावर असलेल्या ' गुंडीचा बारी 'कडे जाते. या रथयात्रेची पर्वणी साधण्यासाठीं हजारों यात्रिक जमलेले असतात. रथ ओढण्यास प्रारंभ करावयाचा मान 'दैत' नांवाच्या आदिवासी जमातींतील माणसाला असतो. रथांच्या दोराला हात लावण्यासाठीं आणि रथ ओढण्याचें पुण्य मिळ-विण्यासाठीं प्रत्येक यात्रिक पुढें होऊं पाहतो.

द्वितीयेच्या दिवशीं संध्याकाळीं रथ ' गुंडीचा बारी ' येथें पोहोंचतो. दुसऱ्या दिवशीं सकाळीं देव तेथील मंदिरांत विराजमान होतात आणि पुढें सात दिवस तेथेंच राहतात. दशमीच्या दिवशीं रथांत बसून देव पुन्हा निजमंदिरांत येतात. या नऊ दिवसांत देव-दर्शनाचा महिमा विशेष मानला जातो. या नऊ दिवसांतील दर्शनाला 'आडपदर्शन' असें म्हणतात. या यात्रेच्या काळांत देवाच्या पूजेची व्यवस्था 'दैतां'कडेच असते.

यांशिवाय जगन्नाथाच्या सेवकांचा उत्सव ( श्रावणी अमावास्या ), झूलनयात्रा ( श्रावण शुक्ल दशमी ), जन्माष्टमी, कालियदमन ( भाद्रपद कृष्ण एकादशी ), पार्श्वपरिवर्तनोत्सव ( भाद्रपद शुक्ल एकादशी ), वामन-



द्वादशी, सुदर्शनविजयोत्सव (आश्विनी पौर्णिमा), इत्यादि अनेक उत्सव येथें होत असतात.

**ओरिसाचा राजा देवाघरचा चांडाळ :**

जगन्नाथाच्या नित्य-नैमित्तिक सेवेसाठीं सेवकांचे ३५-४० वर्ग आहेत. या सेवकांत प्रत्यक्ष ओरिसाच्या राजाचाहि समावेश होतो. रथयात्रेच्या प्रारंभींच्या दिवशीं राजानें मंदिर-सफाईचें काम करावयाची प्रथा अनेक शतकांपासून चालू आहे. चंदनाचें पाणी आणि सोन्याचा कुंचा हातीं घेऊन राजा सफाईला प्रारंभ करतो. त्या दिवशीं राजा स्वत:ला ' देवाघरचा चांडाळ ' समजतो.

या प्रथेवरून ओरिसाच्या इतिहासांत एक विलक्षण प्रसंग घडून आल्याची नोंद आहे. पंधराव्या शतकाच्या अखेरीस ओरिसांत पुरुषोत्तमदेव नांवाचा राजा राज्य करीत होता. तो. इ. स. १४७८ मध्यें गादीवर बसला. कांजीवरमची लावण्यवती राजकन्या पद्मावती हिच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून राजाला तिच्याविषयीं मोह वाटूं लागला. त्यानें कांजीवरमच्या राजाकडे रीतसर मागणी घातली; परंतु कांजीवरमच्या राजानें ही मागणी झिडकारली. कारण ओरिसाचा राजा 'चांडाळ' ( देवाघरचा ) होता ! या

नकारानें पुरुषोत्तमदेव क्रुद्ध झाला आणि त्यानें प्रतिज्ञा केली कीं, “ मी पद्मावतीला बळानें धरून आणीन आणि खरोखरच तिचें चांडाळाशीं लग्न लावीन ! ” या प्रतिज्ञेनुसार पुरुषोत्तमदेवानें कांजीवरमच्या राजावर स्वारी केली आणि त्याचा पराभव करून पद्मावतीला पकडून आणलें. त्यानंतर त्यानें पद्मावतीला मुख्य प्रधानाच्या स्वाधीन करून त्यास सांगितलें कीं, “ हिचें चांडाळाबरोबर लग्न लावण्याची व्यवस्था करा. ”

पुरुषोत्तमदेवाचा प्रधान चाणाक्ष होता. त्याला आणि सर्व प्रजेला असें करणें इष्ट वाटलें नाहीं. पुढें रथयात्रेचा दिवस उजाडला. राजा चंदनाचें पाणी आणि सोन्याचा कुंचा घेऊन मंदिरसफाई करूं लागला. ही संधि साधून प्रधानानें पद्मावतीला राजासमोर आणलें आणि तो राजाला म्हणाला : “ आपण चांडाळ आहांत. राजाची आज्ञा आहे कीं, हिचें चांडाळाबरोबर लग्न लावावें. तेव्हां हिचा स्वीकार करावा. ”

दा. क्र. ९९४०४

प्रजाजनांच्या मुखावर संमतीचें हसूं विलसत होतें. प्रधानाच्या चाणाक्षपणानें आणि पद्मावतीविषयींच्या मनोमन प्रेमानें राजाचा स्वाभाविक क्रोध विरून गेला आणि त्यानें मोठ्या थाटामाटानें पद्मावतीशीं विवाह केला. याच दांपत्याच्या पोटीं ओरिसाचा विक्रमशाली राजा प्रतापरुद्र जन्मास आला आणि त्यानें आपलें हृदय महाप्रभु चैतन्यांच्या भक्तींत लीन केलें.

## पुरींतील पवित्र स्थळें :

**जलतीर्थे :** जगन्नाथाच्या अवतीं-भोंवतीं असलेल्या शें-सवाशें मंदिरांशिवाय जगन्नाथपुरींत अनेक जलतीर्थें, मठ-मंदिरें आणि संस्मरणीय स्थानें आहेत. पुरींतील सर्व महत्त्वाच्या मंदिरांजवळ जलकुंडें आहेत. महोदधि ( समुद्र ), रोहिणी-कुंड, इंद्रद्युम्न सरोवर, मार्कंडेय सरोवर, श्वेत-



गंगा, चंदन तलाव, लोकनाथ सरोवर, चक्रतीर्थ हीं आठ पवित्र जलतीर्थं समजलीं जात. समुद्राकडे जाण्याचा रस्ता निजमंदिरापासून अगदीं सरळ आहे. निजमंदिरापासून समुद्रतट एक मैलावर आहे. समुद्रावरील स्नानाच्या जागेला 'स्वर्गद्वार' म्हणतात. रोहिणी-कुंड मंदिर-परिसरांतच असून त्यावर मंदिराच्या शिखरावरील सुदर्शनचक्राची छाया पडते. इंद्रद्युम्न सरोवर मंदिरापासून मैल-दीड मैल अंतरावर 'गुंडीचा बारी' या प्रसिद्ध मंदिराजवळ आहे. मार्कंडेय सरोवर आणि चंदनतलाव हीं दोन्ही जलतीर्थं जवळ जवळ असून तीं निजमंदिरापासून अर्धा मैल दूर आहेत. श्वेतगंगा स्वर्गद्वाराच्या मार्गावर आहे आणि लोकनाथ सरोवर निजमंदिरापासून दोन मैलांवर लोकनाथ-मंदिराजवळ आहे. याला 'शिवगंगा' असेंहि म्हणतात.

**उद्यानगृह :** जगन्नाथपुरींतील प्रसिद्ध ठिकाणांत 'गुंडीचा बारी' ('उद्यानगृह' किंवा 'जनकपूर') हें स्थान विशेष महत्त्वाचें आहे. हें मंदिर बागेंत मध्यभागीं आहे. मंदिराभोंवतीं कोट आहे. याहि मंदिराचे भोग-मंदिर, नटमंदिर वगैरे चार भाग आहेत. वार्षिक रथयात्रेच्या वेळीं देवमूर्ति येथें नऊ दिवस राहतात. इतर वेळीं येथें मूर्ति नसते.


**एमार मठ :** जगन्नाथमंदिराच्या सिंहद्वाराच्या समोरच्या भागांत श्रीरामानुजाचार्य यांचा मठ आहे. त्यास 'एमार मठ' असें म्हणतात. येथें स्वतः आचार्य कांहीं काळ राहिले होते. मठांत गोपाळकृष्णाची मूर्ति आहे. या मठांतील वैष्णवांच्या सान्निध्यांतच आसामचा विख्यात संतपुरुष शंकरदेव याला स्फूर्ति लाभली, असें म्हणतात.

**गंभीरा मठ :** महाप्रभु चैतन्यांच्या निवासानें पुनीत झालेलें हें स्थान स्वर्गद्वाराच्या मार्गावर एका आळींत आहे. या स्थानाला 'गंभीरा मठ' किंवा 'श्रीराधाकान्त मठ' असें म्हणतात. येथें श्रीकाशीमिश्र नामक चैतन्यभक्ताचें घर होतें. त्याच्या घरीं चैतन्यांनीं अठरा वर्षं निवास केला. या ठिकाणीं राधाकान्ताचें मंदिर असून त्यांत राधा-कृष्णाच्या मनोहर

मूर्ति आहेत. आंतल्या बाजूस गंभीरामंदिर आहे. यांत महाप्रभूंच्या पादुका, त्यांचें पांघरण्याचें वस्त्र, त्यांची माळ इत्यादि संस्मरणीय वस्तु जतन करून ठेवल्या आहेत. त्या वस्तूंच्या दर्शनामुळें महाप्रभूंची प्रेमोन्मत्त श्रीमूर्ति आजहि यात्रिकांच्या मनश्चक्षूंसमोर उभी राहते. या स्थानाजवळ ' शंकरानंद मठ ' या नांवाचा एक मठ आहे. त्यांत भागवताचे विख्यात टीकाकार श्रीधरस्वामी राहत असत.

**सिद्धबकुल :** गंभीरा मठाच्या गल्लींतून निघून थोडें पुढें गेल्यावर दुसऱ्या एका गल्लींत हें स्थान आहे. येथें हरिदासजी नांवाचे एक वैष्णव भजन करीत बसत. या ठिकाणीं प्रत्यक्ष महाप्रभु चैतन्यांनीं बकुळाचें झाड लावलें आहे, असें म्हणतात. हरिदासजींना महाप्रभूंनीं स्वहस्तें समाधि दिली. त्यांच्या समाधीचें स्थान स्वर्गद्वारापासून उजवीकडून जाणाऱ्या मार्गावर अर्धा मैल दूर आहे.

**गोवर्धनपीठ :** समुद्राकडे जाणाऱ्या रस्त्यावरून उजव्या बाजूला फुटणाऱ्या दुसऱ्या रस्त्यावर हा शंकराचार्यांचा मठ आहे. आद्य शंकराचार्यांच्या चार प्रमुख मठांपैकीं हा एक आहे. मठांतील आचार्यपरंपरा अखंड चालू आहे. पूर्वभारतांतील धर्मजागृतीचें एक महान् केंद्र म्हणून



इंद्रद्युम्न सरोवर

जें जें देखे भूत। तें तें मानिजे भगवंत।
ऐसा भक्तियोग निश्चित। जाण माझा ॥

या स्थानाचें ऐतिहासिक महत्त्व आहे. मठांत आद्य शंकराचार्यांची मूर्ति असून इतर अनेक देवतांच्या मूर्ति आहेत.

**तोटा गोपीनाथ :** हरिदासजींच्या समाधिस्थानाच्या पुढें सुमारें एक मैलावर हें स्थान आहे. इथें वाळूचा एक उंचवटा आहे, त्यास 'चटकगिरि' म्हणतात. येथील वाळूच्या ढिगांत महाप्रभूंना सांपडलेल्या गोपीनाथाच्या मूर्तीचें मंदिरहि येथें आहे. येथूनच महाप्रभूंना कृष्णलीलांचीं अनंत दर्शनें घडलीं असें म्हणतात. महाप्रभु अखेर याच मूर्तींत विलीन झाले, अशीहि आख्यायिका आहे. गोपीनाथाच्या मूर्तीवर एक सुवर्णरेखा दिसते, तीच महाप्रभूंच्या विलीनीभवनाची खूण आहे, असें म्हणतात.

**लोकनाथ :** तोटा गोपीनाथापासून सुमारें अर्ध्या मैलावर वन-प्रदेशांत हें शिवमंदिर आहे. जगन्नाथमंदिरापासून येथें यायला सडक आहे. त्या सडकेनें हें स्थान मंदिरापासून दोन-अडीच मैल दूर आहे. या मंदिरांतील शिवलिंग नेहमीं पाण्यांत बुडालेलें असतें. पूजाद्रव्यें पाण्या-वरच वाहतात.

**बेडी हनुमान :** रेल्वे-स्टेशनावरून समुद्रकांठीं जाण्याच्या रस्त्या-वर सुमारें अर्ध्या मैलावर एक हनुमानाचें मंदिर आहे. हें मंदिर उंच चौथऱ्यावर आहे. या हनुमानाच्या पायांत बेडी असल्यामुळें त्याला 'बेडी हनुमान' असें म्हणतात. "समुद्राचें पाणी क्षेत्रसीमेंत शिरूं नये म्हणून जगन्नाथानें याची नेमणूक केली होती. परंतु एकदां हा रामनवमीचा उत्सव पाहण्यासाठीं गुपचूप अयोध्येला गेला. हें जगन्नाथाला समजतांच त्यानें याच्या पायांत बेडी अडकविली. हेतु हा कीं, पुनः यानें येथून हलूं नये." अशी गमतीची आख्यायिका या हनुमानाविषयीं प्रचलित

आहे. लोकप्रतिभा भक्तीच्या क्षेत्रांतहि कसें खेळकर रूप धारण करते, याचा हा नमुना आहे.


**चक्रतीर्थ आणि चक्रनारायण :** बेडी हनुमानाच्या मंदिरा-समोरच समुद्रकांठीं चक्रनारायणाचें मंदिर आहे. हें प्राचीन मंदिर आतां जीर्ण झालें आहे. या मंदिरामागेंच चक्रतीर्थ आहे. चक्रतीर्थ समुद्राचेंच पाणी आहे. अतिप्राचीन काळीं इंद्रद्युम्न राजाला दृष्टान्तानुसार लांकडाचा ओंडका वाहत आलेला दिसला तो याच ठिकाणीं, अशी समजूत आहे.

**कानवत हनुमान :** हें हनुमान-मंदिर निजमंदिरापासून अर्धा मैल दूर आहे. बेडी हनुमानाप्रमाणेंच याचीहि नियुक्ति जगन्नाथा-नेंच केलेली आहे. समुद्राच्या गर्जनेनें सुभद्रेची झोप मोडूं नये, यासाठीं यानें काळजी घ्यावयाची असते. हा सदैव समुद्राच्या गर्जनध्वनीकडे कान लावून बसलेला असतो, अशी कल्पना असल्यामुळें याला ' कानवत हनुमान ' असें म्हणतात.

याशिवाय कबीरमठ ( समुद्रकांठीं स्वर्गद्वाराजवळ ), नानकमठ ( सिंहद्वारासमोर ), महाप्रभु वल्लभाचार्यांची बैठक ( निजमंदिरासमोरील मोठ्या रस्त्यावर ), चैतन्यांचे अनुयायी श्रीराय रामानंद यांचें स्थान अस-लेला जगन्नाथवल्लभ मठ ( निजमंदिरासमोरील मोठ्या रस्त्यावर ), श्रीविजय-कृष्ण गोस्वामींचें समाधि-मंदिर ( चंदनतलावाजवळ ), महात्मा सालबेगची समाधि ( बडदांड भागांत ), जगन्नाथदासाचा आश्रम, तसेंच रामानंद संप्रदाय, निंबार्क संप्रदाय आणि गौडीय वैष्णव संप्रदाय यांचे मठ इत्यादि अनेक संस्मरणीय आणि दर्शनीय स्थानें सर्व क्षेत्रभर विखुरलेलीं आहेत.

ओरिसांतील मंदिरें ज्या शिल्पसौंदर्यानें नटलेलीं आहेत, त्या शिल्पसौंदर्याची उपासना करणारे कांहीं कलावंत अजूनहि आहेत. दगडांतील कोरीव काम उत्तम रीतीनें करणारे

शिल्पी पुरींतहि आढळतात. ओरिसाच्या शासनसंस्थेनें अशा कलावंतांना उत्तेजन देण्याचें योजिलें आहे. ओरिसांतील शिल्पसौंदर्याच्या नमुन्यांचें एक स्थायी प्रदर्शन पुरीमध्यें कॉटेज इंडस्ट्रीज एंपोरियममध्यें पहावयास मिळतें. पुरींतील रघुनंदन ग्रंथशाळेंत ओरिसाच्या इतिहासाचीं नि संस्कृतीचीं महत्त्वाचीं साधनें ठरणारीं भूर्जपत्रांवरील अनेक हस्तलिखितें सुरक्षित ठेवलेलीं आहेत.



जगन्नाथ-मंदिराचें महाद्वार

या सर्व पवित्र आणि प्रेक्षणीय स्थानांत साधु-संतांच्या निवासानें पुनीत झालेलीं आणि त्यांच्या उदात्त जीवनाची नि तेजस्वी उपदेशाची स्मृति सतत जागृत ठेवणारीं स्थानेंच अधिक आहेत. जगन्नाथ-पुरीच्या भूमींत संतहृदयाचा सुगंध सर्वत्र दरळवत आहे. त्या सुगंधाचा अनुभव घेण्याची शक्ति ज्याच्याजवळ आहे, असा सहृदय यात्रिक पुरींतून रित्या हृदयानें परत येणार नाहीं.

**जगन्नाथाची प्रेरणा :**

जगन्नाथपुरीच्या माहात्म्याविषयीं अनेक पुराणकथा आणि आख्यायिका प्रचलित आहेत. सर्वसाधारण जनतेच्या भोळ्या-भाबड्या श्रद्धेंतून का होईना, एखाद्या देवतेचें वा क्षेत्राचें महिमान वाढलें कीं, संस्कृतीचा नि धर्माचा उद्धार करूं पाहणारे महापुरुष त्या जन-श्रद्धेची सरिता इष्ट मार्गावर वळवितात आणि मग त्या शुद्ध श्रद्धेच्या आधारानें आपलें जीवितकार्य सफळ बनवितात. इतिहास-काळांत जगन्नाथपुरीशीं निगडित असलेला पहिला महापुरुष म्हणजे श्रीशंकराचार्य. आचार्यांचा अवतार इसवी सनाच्या आठव्या शतकांत झाला. अर्थात् जगन्नाथपुरी हें स्थान त्यांच्यापूर्वींच हिंदूंचें एक सर्वप्रिय क्षेत्र म्हणून प्रसिद्धि पावलेलें होतें. बुद्धधर्माच्या ऱ्हासकाळांत भारताच्या धर्मजीवनांत ज्या हीन प्रवृत्ति आणि जे हीन आचार शिरले होते, त्यांना नष्ट करून भारताचें धर्मजीवन तेजस्वी आणि निरोगी बनविण्याचें महान् कार्य श्रीशंकराचार्यांनीं केलें.

आपल्या कार्याचें सातत्य रहावें आणि धर्मज्योतीवर काजळी चढूं नये, यासाठीं त्यांनीं भारताच्या चारी दिशांच्या भागांत चार जागतीं धर्म-केंद्रें उभारलीं. या त्यांच्या विराट् योजनेनुसार / पूर्वभारतांतील केंद्र स्वाभाविकपणेंच भारत-विख्यात जगन्नाथपुरींत उभारलें गेलें, या केंद्राचें नांव गोवर्धन मठ. / अशा प्रकारें पुरीचा ज्ञात इतिहास धर्मोद्धार आणि धर्मशुद्धि करणाऱ्या महापुरुषाच्या कार्यानें सुरू झालेला आहे.

शंकराचार्यांनंतर जगन्नाथपुरीनें ज्याच्या स्मृति मोठ्या प्रेमानें उरीं वागवल्या आहेत, तो भाग्यवंत म्हणजे पूर्वेचा विख्यात वैष्णव कवि जयदेव. इसवी सनाच्या बाराव्या शतकांत होऊन गेलेल्या या कवीनें आपल्या 'गीतगोविन्द' या संस्कृत काव्यानें भारतीय वैष्णव परंपरेंत आणि भारतीय लोकभाषांतील साहित्यांत नवा चैतन्यमय प्रवाह सुरू केला. उत्कलभूमींतील जयन्ती नदीच्या कांठीं असलेल्या किंदुबिल्व गांवीं त्याचा जन्म झाला. संस्कृत पाठशाळेंत त्यानें संस्कृत साहित्याचें अध्ययन केलें. नंतर तरुणपणांतच निराश्रित होऊन तो पुरीच्या वाटेला लागला. त्याचें भक्तिप्रवण कविहृदय जगन्नाथपुरीच्या वाटेवर कृष्णलीलांच्या चिंतनांत रंगून गेलें आणि त्या भक्तीनें कांठोकांठ उचंबळणाऱ्या हृदयांतून काव्याचे निर्झर झरूं लागले. तो वर्तमानकाळ विसरला, पुरीची वाट विसरला आणि चालतां चालतां स्वप्नमय मन:स्थितींत वृंदावनांत यमुनेच्या तीरावर संचार करूं लागला. " यमुनेचें निळें पाणी शांतपणें वाहत आहे. सायंकाळच्या आंजिरी छाया पाण्यावर तरंगत आहेत. वृंदावनांतील फुलांचा सुगंध घेऊन शीतल वारा वाहत आहे आणि कदंबाच्या झाडाखालीं कृष्ण वेणु वाजवीत आहे. " या मधुर स्वप्नांत जयदेवाची प्रतिभा खुलूं-फुलूं लागली आणि राधा-कृष्णाच्या प्रेमलीलांचीं सुमधुर गीतें त्याच्या ओठांतून झरूं लागलीं.



> देव म्हणजे आपुला प्राण। प्राणासि न करावें निर्वाण।
> परम प्रीतीचें लक्षण। तें हें ऐसें असे ॥

जयदेव जगन्नाथपुरींत आला. तेथें जगन्नाथाचें दर्शन होतांच त्याचीं दमलीं-भागलेलीं गात्रें सचेत झालीं. तो तेथेंच राहिला. तो नित्य जगन्नाथाच्या सान्निध्यांत रहायचा आणि त्याच्या लीलागायनांत स्वत:ला विसरून जायचा. अशा तल्लीन अवस्थेंत 'गीतगोविंद' काव्य पूर्ण झालें. जयदेव जगन्नाथाच्या सम्मुख बसून तें अमृतमधुर गीतिकाव्य आपल्या मंजुळ स्वरानें गाऊं लागला कीं, त्याच्या काव्यांतील भाव-माधुरीनें आणि त्याच्या कंठांतील स्वरमाधुरीनें लोभावलेले श्रोते जिवाचा कान करून ऐकूं लागत. जयदेवाची ती 'मधुरकोमलकांतपदावली' पुरीच्या जनमानसांत आनंदाचें उधाण निर्माण करूं लागली. जणुं जनहृदयाच्या रूपानें प्रत्यक्ष जगन्नाथच 'गीत-गोविन्दा'च्या तालावर डोलूं लागला. 'गीत-गोविन्द' रचतां-गातांना जयदेव स्वत:च कृष्णरूप बनून गेला. या पुरींतील निवासांतच जयदेवाला पद्मेसारखी सत्त्वशील जीवनसखी लाभली.

जगन्नाथाच्या साक्षीनें रचलेलें गेलेलें जयदेवाचें 'गीतगोविन्द' हें काव्य युगप्रवर्तक आहे. त्या काव्यानें आपल्या अभिनव गीतस्वरूपानें संस्कृत साहित्याच्या परंपरेवर सोनेरी कळस चढविला; त्यानें भारतीय वैष्णव परंपरेंत कृष्णसखी राधा चिरंतन बनविली आणि भारतीय लोक-भाषांतील अनेक कवींना ललितरचनेची वाट दाखविली.

जयदेवाचा वारसा घेऊन राधाभावानें कृष्णभक्तींत धुंद झालेले बंगालचे महाप्रभु चैतन्य यांचें कार्यक्षेत्रहि जगन्नाथपुरी हेंच होतें. महाप्रभु चैतन्य यांचा जन्म बंगालमधील नवद्वीपांत इ. स. १४८५ मध्यें झाला. लहानपणीं उनाड बालक, कुमार वयांत उद्धट पण व्यासंगी विद्यार्थी आणि तारुण्यांत गर्विष्ठ महापंडित म्हणून गाजलेले विश्वंभरमिश्र अथवा निमाई

पंडित हे ईश्वरपुरी नांवाच्या वैष्णव संन्याशाच्या प्रभावानें कृष्णभक्त बनले आणि त्यानंतर संन्यासी बनून कृष्णभक्तीच्या धुंदींत स्वतःला विसरून वावरूं लागले. हे निमाई पंडित म्हणजेच श्रीचैतन्य महाप्रभु होत. गौर कांति, उन्नत भालप्रदेश, विशाल आणि काळेभोर डोळे, कुरळे केस यांमुळें श्रीचैतन्यांना 'गौरांगप्रभु' किंवा 'गौरचंद्र' म्हणत. त्यांची ती विलोभनीय मूर्ति कृष्णभक्तीच्या आवेगांत नाचूं लागली म्हणजे पाहणाऱ्यांना प्रत्यक्ष कृष्णदर्शनाचा प्रत्यय येत असे. वैष्णव धर्माचा अंगीकार केल्यानंतर श्रीचैतन्यांनीं नवद्वीपांत आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या नि भक्तीच्या प्रभावानें अनेकांना वैष्णव धर्माची दीक्षा दिली आणि कर्मकांडांत व वर्णविद्वेषांत पिचणाऱ्या धर्माला त्यांनीं इष्ट वळण लावलें. संन्यासग्रहणानंतर ते पुरीला आले. कृष्णमूर्तीच्या दर्शनानें, कृष्णनामाच्या संकीर्तनानें आणि कृष्ण-लीलांच्या श्रवणानें वा स्मरणानें त्यांचें देहभान नष्ट होत असे आणि ते एकदम जमिनीवर कोसळत असत. भक्तीच्या अशा दिव्योन्मादांत त्यांच्या शरीराला अनेकदां जखमा होत असत. जगन्नाथाचें दर्शन घेत असतांनाहि कृष्णरूपांत ते इतके तन्मय झाले कीं, त्यांची शुद्धच हरपली. त्यांना तशाच अवस्थेंत सार्वभौम भट्टाचार्य नामक पंडितानें आपल्या घरीं नेलें. तेथें ते आपल्या शिष्यांसह तीन महिने राहिले. या तीन महिन्यांच्या काळांत त्यांना अनेक नवे अनुयायी मिळाले; सार्वभौम भट्टाचार्यांनींहि त्यांचें शिष्यत्व पत्करलें आणि आधींच भक्तिमय वातावरणानें युक्त असलेल्या जगन्नाथपुरीला चैतन्यांच्या सान्निध्यानें नवें चैतन्य प्राप्त झालें. जगन्नाथ-पुरींतील पहिल्या निवासानंतर त्यांनीं दाक्षिणयात्रेंत दोन वर्षें घालविलीं. दाक्षिणयात्रा संपवून ते पुनः पुरी येथेंच आले. जगन्नाथाच्या चरणांची जवळीक सोडणें त्यांना अशक्य होतें. दाक्षिणयात्रेहून परतल्यावर महा-प्रभूंच्या भक्तीचा प्रकाश सहस्रकळांनीं फांकूं लागला. त्यांची कीर्ति ऐकून ओरिसाचा राजा प्रतापरुद्र त्यांच्या दर्शनांत, त्यांच्या सान्निध्यांत स्वतःला

धन्य मानूं लागला. मोठमोठे पंडित त्यांच्या चरणीं आपल्या ज्ञानाचा अहंकार विसरून माथा नमवूं लागले. साऱ्या पूर्व-भारतांत त्यांच्या स्फूर्तीनें आणि उपदेशानें समाजमनांत भक्तीची गंगा दुथडी भरून वाहूं लागली. ते जगन्नाथमंदिरांत नित्य नामसंकीर्तन करीत, वैष्णवांशीं भक्तिचर्चा करीत, अभक्तांना भक्त बनवीत, कर्मठांचीं हृदयें प्रेमानें जिंकीत, जगन्नाथाच्या वार्षिक रथयात्रेंत आपल्या शिष्यवृंदासह नाचत-गात असत आणि सहस्रावधि यात्रिकांचीं मनें आकर्षून घेत. त्यांचें जीवन म्हणजे भक्तीची वेगवान् गंगा होती. दक्षिणयात्रेनंतर ते एकदां बंगालमध्यें जाऊन आईला भेटून आले आणि त्यानंतर वृंदावनांत जाऊन तेथें वैष्णवधर्माला नवी चेतना देऊन पुनः पुरींतच येऊन राहिले. त्यांचें महाप्रयाणहि पुरींतच घडलें. कुणी म्हणतात, ते जगन्नाथाचें दर्शन घेत असतांना जगन्नाथाच्या मूर्तींत अंतर्धान पावले; तर कुणी म्हणतात, रथयात्रेंत बेहोश होऊन नाचत असतांना त्यांना दुखापत झाली आणि तें दुखणें जास्त वाढून त्यांतच त्यांचा अंत झाला. परंतु या दोनहि मतांपेक्षां निराळें असें एक मत आहे, तें त्यांच्या भावावेगाचा विचार करतां, सत्य वाटतें. एकदां महाप्रभु चांदण्या रात्रीं पूर्व-समुद्राच्या तीरावर उभे होते. सागराच्यां अथांग जळ-राशीवर चांदणें झळाळत होतें. सारा परिसर शांतीनें भारलेला होता. अशा वेळीं समोरच्या सागरजळाकडे पाहतां पाहतां महाप्रभूंचें हृदय यमुनेच्या कांठीं संचार करूं लागलें आणि घनश्याम कृष्णासह जलविहार करण्यासाठीं त्यांनीं यमुनेच्या प्रवाहांत — नव्हे समोरच्या उफाळलेल्य सागरांत उडी घेतली !

•

— अशा प्रकारें बंगालमध्यें जन्मलेल्या चैतन्यांची जीवनगाथा जगन्नाथपुरीच्या इतिहासाशीं सर्वथा एकरूप बनली आहे. ओरिसांत गांवोगांवीं चैतन्यांचीं मंदिरें आहेत. अशा मंदिरांची संख्या ८०० च्या वर आहे. उडियांतील लोक त्यांना ‘ जगन्नाथाचा अवतार ’ मानतात.

जगन्नाथाच्या दर्शनांतून ज्याच्या जीवनाला चैतन्य लाभलें, असा आणखी एक महापुरुष म्हणजे शंकरदेव. शंकरदेव हा आसाममधील नौगांव जिल्ह्यांतील आलिपुखुरी या गांवीं जन्मला. त्याचा काळ इ. स. १४४९-१५६९ असा आहे. तो शूद्र श्रेणींतील कायस्थ

जातीचा होता. लहानपणींच त्यानें संस्कृत पाठशाळेंत धर्मग्रंथांचें उत्तम अध्ययन केलें होतें. पत्नी वारल्यानंतर तो घर सोडून तीर्थयात्रेला निघाला. या तीर्थयात्रेंत उत्तर-भारतांतील अनेक तीर्थांत त्यानें विवेक-शीलतेनें संतांच्या भेटी घेतल्या, त्यांचे विचार समजावून घेतले. त्यानंतर तो जगन्नाथपुरी येथें आला. तेथें रामानुजाचार्यांच्या परंपरेंतील संतांचा सहवास अनुभवतांना त्याचे विचार स्पष्ट झाले; त्याच्या हृदयांत रुजलेली भक्तीची भावना दृढावली आणि जगन्नाथाच्या पायांवर डोकें ठेवून त्यानें प्रतिज्ञा केली कीं, " यापुढें माझें जीवन प्रभुसेवेंत आणि प्रभुसंकीर्तनांतच व्यतीत होईल. "

विष्णुभक्तीनें भारलेल्या शंकरदेवानें पुढें संपूर्ण आसामच्या जनहृदयाची पकड घेतली. त्यानें आपल्या भक्तीनें, बुद्धिप्रभावानें, कवित्वानें आणि लोककल्याणाच्या तळमळीनें राव-रंक, ब्राह्मण-शूद्र, शिक्षित-अशिक्षित, नागर-ग्रामीण अशा सर्व प्रकारच्या लोकांना विष्णु-भक्तीच्या मार्गाला लावलें. त्यानें आसाममध्यें जागोजाग उभारलेलीं 'सत्रें' ( उदार विचारांचे मठ ) म्हणजे संस्कृतीचीं छोटीं छोटीं प्रभावी विद्यापीठेंच होतीं. शंकरदेवाच्या उदयापूर्वी आसाममध्यें शाक्त संप्रदायाचा फार मोठा पगडा होता. आसाममधील सर्व जनता जादू-टोणा, मंत्र-तंत्र, पशुबळी आणि यांहूनहि भयंकर असे विकृत, किळसवाणे प्रकार भक्तीच्या नांवा-खालीं अनुभवीत होती. धर्माच्या नांवाखालीं हीन आचार पाळण्यांत गढलेल्या आसामी जनमानसाला शंकरदेवानें जागृत केलें आणि धर्माचें शुद्ध स्वरूप घरोघरीं पोहोंचविलें. त्यानें आपल्या भक्तिप्रसारासाठीं असमिया भाषेचा आश्रय घेऊन प्रचंड ग्रंथरचना केली. त्याच्या रचना-संभारांत भागवताचा अनुवाद आहे, शेंकडों भक्तिगीतें आहेत आणि भक्तिपर नाटकेंहि आहेत. शंकरदेव हा आसामी संस्कृतीचा चिरंजीव सम्राट् आहे. त्याच्या स्मृतींत जगन्नाथाच्या प्रेरणेची साक्ष आहे.

पंधराव्या शतकांत जगन्नाथाच्या प्रेरणेनें संपूर्ण पूर्व-भारतांत संस्कृतीचें जें नवजागरण घडून आलें, त्यांत ओरिसाचे तीन श्रेष्ठ कवि सरलदास, जगन्नाथदास आणि बलरामदास मानाचे स्थान पावले आहेत. महाप्रभु चैतन्यांच्या पुरींतील निवासामुळें पुरीच्या भूमींत वैष्णवधर्माचीं बीजें

रुजली आणि लौकरच त्या बीजांतून भक्तीचा फुलोरा फुलला. महाप्रभूंच्या प्रभावानें भारलेल्या पांच पुरुषांनीं ओरिसांत भक्तीचा प्रसार केला. त्यांच्या वैष्णव परंपरेला 'पंचसखा संप्रदाय' असें नांव आहे. या पंचपुरुषांत वरील तिघे जण विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांनीं उडिया भाषेंत अनुक्रमें महाभारत, भागवत आणि रामायण यांची रचना केली आणि ओरिसांतील वैष्णवधर्माचें पायाभरण केलें. हे तिघेहि ओरिसाचे आद्य राष्ट्रीय कवि समजले जातात. सरलदासाचें महाभारत 'उडिया संस्कृतीचा महाकोश' ठरलें आहे, तर बलरामदासाचें रामायण आपल्या असामान्य लोकप्रियतेनें 'दण्डी रामायण' असें नामाभिधान पावलें आहे. दण्डी म्हणजे रस्ता. जें रस्तोरस्तीं प्रेमानें गायिलें जातें, तें 'दण्डी रामायण'. जगन्नाथदासाची तपोभूमि जगन्नाथपुरींतच होती. आजहि पुरींत जगन्नाथदासाच्या आश्रमाची जागा दाखवली जाते. हा 'जगन्नाथाचा दास' ओरिसांतील सांस्कृतिक पुनरुत्थानाचा प्रवर्तक मानला जातो. त्यानें रचलेल्या उडिया भाषेंतील भागवताची प्रत ओरिसांत घरोघरीं प्रेमानें आणि श्रद्धेनें वाचली जाते. ओरिसांतील ग्रामीण जनतेवर तर त्या ग्रंथाचा इतका प्रभाव आहे कीं, उडिया शेतकरी आपल्या मुलानें आपणांस जगन्नाथाचें भागवत वाचून दाखवावें यासाठीं त्याला शाळेंत पाठवतो. उडिया शेतकऱ्याच्या कष्टव्यथित जीवनांत जगन्नाथाच्या भागवतानें भक्तीची संजीवनी ओतली आहे. जगन्नाथदासानें ऐन तारुण्यांत वैष्णवधर्माची दीक्षा घेतली आणि आपल्या अनन्यनिष्ठेनें महाप्रभूंच्या शिष्य-मंडळांत अग्रस्थान प्राप्त केलें. महाप्रभु त्याला 'अतिवादी' (उदात्त पुरुष) म्हणत असत. त्यानें भक्तीचें उदार तत्त्वज्ञान लोकभाषेंतून लोकांपर्यंत पोहोंचविलें आणि वर्णविद्वेषांत पिचणाऱ्या ओरिसांतील जनसाधारणाच्या हृदयांत उद्धाराच्या नव्या प्रेरणा निर्माण केल्या. त्याच्या या कार्यामुळें जनतेंत अध्ययनाची आस्था निर्माण झाली. त्यानें ज्ञानप्रसारासाठीं लोकभाषेचा आश्रय केल्यामुळें उच्चवर्णीयांचीं मस्तकें भडकलीं आणि त्यांनीं जगन्नाथदासाच्या ग्रंथाची 'तेली भागवत' म्हणून हेटाळणी सुरू केली. परंतु त्या हेटाळणींतच त्याच्या बहुजनप्रियतेची कबुली होती !

इ. स. १५४० मध्यें ओरिसांतील सूर्यवंशी राजघराण्याचा अंत होतांच उडिया संस्कृतीचें सुवर्णयुग समाप्त झालें. परंतु त्यानंतरच्या संघर्षाच्या, संकटांच्या नि उद्‌ध्वस्त जीवनाच्या काळांतहि जगन्नाथदास आणि त्याचे सहकारी यांनीं निर्माण केलेल्या संस्कृतीच्या उदात्त प्रेरणा लोकमानसांत अखंड तेवत राहिल्या. आजहि उत्कलभूमीच्या नवविकासांत जगन्नाथदासाचा वारसा फलदायी ठरत आहे. या महान् प्रभावाची जाणीव होतांच, ज्याचें दास्य पत्करून जगन्नाथदासानें आपलें जीवन जन-हितार्थ वेंचलें, त्या जगन्नाथाच्या चरणीं आपलें हृदय नकळत विलीन झाल्याशिवाय राहत नाहीं.

— ही झाली अल्पशी नामावली. परंतु जगन्नाथपुरी हें चारी धामांच्या यात्रेंतील एक प्रख्यात क्षेत्र असल्यामुळें सत्संगतीच्या हेतूनें भारत-यात्रा करणारा प्रत्येक संत जगन्नाथपुरीला येऊन जात असणार. इथल्या भूमीनें आपल्या हृदयांत हजारों संतांच्या पाऊलखुणा अजूनहि जतन केल्या आहेत. त्यांतल्या कित्येकांचीं नांवेंहि आपल्याला माहीत नाहींत.



स्थळप्रत.
वि: ४-५।१५
नों दि ८।८।६

# यात्रिकांच्या सोयीसाठीं

**स्थान :** ओरिसा प्रांतांतील पुरी जिल्ह्यांत पूर्वसमुद्राच्या कांठीं.

**मार्ग :** मुंबईहून रेल्वेनें १२५२ मैल आणि कलकत्त्याहून ३१० मैल आहे. मुंबईहून नाशिक, धुळें, भुसावळ, नागपूर, रायपूर, संबलपूर, अंगुल, कटक आणि भुवनेश्वर असा मोटारनेंहि प्रवास करतां येईल. मोटारनें ११५२ मैलांचा प्रवास आहे. भुवनेश्वर ते पुरी ३९ मैल अंतर आहे. कटक, भुवनेश्वर, खुर्दारोड इत्यादि जवळच्या ठिकाणांहून पुरी-कडे जाणाऱ्या बसेस् आहेत. पुरी स्टेशनापासून जगन्नाथ-मंदिर एक मैल अंतरावर आहे.

**रहाण्याच्या जागा :** यात्रिकांना उतरण्यासाठीं पुरींत अनेक मठ आणि धर्मशाळा आहेत. धर्मशाळांपैकीं दूधवाल्यांची धर्मशाळा, गोयंका धर्मशाळा, सेठ कन्हयालाल बागलाची धर्मशाळा या तीन प्रसिद्ध धर्म-शाळा मोठ्या रस्त्यावर असून, शेठ धनजी मूळजीची धर्मशाळा, बिकानेर-वाल्यांची धर्मशाळा आणि आशाराम मोतीराम धर्मशाळा या तीन धर्म-शाळा 'दलबेदी कोना' विभागांत आहेत. खेमका धर्मशाळा कचेरी रस्त्यावर डोलमंडपसाहीमध्यें आहे. साऊथईस्टर्न रेल्वेचें हॉटेल पाश्चात्य पद्धतीचें असून तेथें राहण्याजेवण्याचा खर्च एक खोली – २५ ते ३० रुपये, दुहेरी खोली – ४० ते ४५ रुपये असा येतो. भारतीय पद्धतीचीं हॉटेल्स सी-व्ह्यू हॉटेल, पुरी हॉटेल, व्हिक्टोरिया क्लब हॉटेल, बॅरन्स हॉटेल, पुरी व्ह्यू हॉटेल, ओशन व्ह्यू हॉटेल, ग्रँड हॉटेल, बे-व्ह्यू हॉटेल इत्यादि असून त्यांत राहण्याजेवण्याचे रोजचे दर माणशीं ४ ते १० रुपये असे आहेत. यांशिवाय आणखीहि राहण्याच्या सोयी आहेत. पी. डब्ल्यू. डी. इन्स्पेक्शन बंगल्यांत राहण्याचा रोजचा माणशीं दर ३·५० रुपये आहे. सर्किट हाउसमध्यें रहाण्याचा रोजचा माणशीं दर तेवढाच आहे. फॉरेस्ट रेस्ट हाउस आणि साउथ-ईस्टर्न रेल्वे कॅंपिंग कोच यांत राहण्याचा रोजचा माणशीं दर अनुक्रमें २·५० व १ रुपया असा आहे. या ठिकाणीं राहण्यासाठीं रिझर्व्हेशन करावें लागतें. रिझर्व्हेशनच्या सोयी अनुक्रमें ( १ ) सुपरिंटेंडिंग इंजिनियर, पी. डब्ल्यू. डी. सेंट्रल

सर्कल, भुवनेश्वर; ( २ ) डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, पुरी; ( ३ ) डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, खुर्दा; ( ४ ) स्टेशनमास्तर, पुरी; यांच्या ऑफिसांत आहेत.

**क्षेत्रफळ :** ७ चौरस मैल.

**लोकवस्ती :** ४९,०५७.

**उंची :** समुद्रसपाटी.

**हवामान :** हिंवाळा—जास्तींत जास्त २६·६° सें. व कमींत कमी १०·५° सें.; उन्हाळा—जास्तींत जास्त ४०·६° सें.; व कमींत कमी २६·६° सें.; पाऊस—१८९३″ ( जूनच्या मध्यापासून सप्टेंबरपर्यंत ). पावसाळा सोडून सर्व काळ प्रवासास उत्तम.

**कपडे :** हिंवाळ्यांत सौम्य लोंकरीचे व उन्हाळ्यांत पातळ कापडाचे.

**भाषा-व्यवहार :** उडिया, हिंदी, इंग्रजी.

**स्थानिक वाहनें :** टॅक्सी, बस, सायकल, रिक्शा.

**जवळचीं प्रेक्षणीय स्थळें :** सखीगोपाळ-मंदिर — १२ मैल, कोणार्कचें सूर्य-मंदिर — १२ मैल, भुवनेश्वर — ३९ मैल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 11808
ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
31.11.2 वि: ग्र. प्रवास
220 नों. दि: 8.8.67

## एक विराट् संकल्प

... आज भारताचीं नवी घडण करण्यासाठीं आपण बद्धपरिकर झालों आहोंत. भारत हें पुरातन राष्ट्र आहे. या राष्ट्राच्या अगणित सुपुत्रांनीं तपाचे हिमालय उभे करून भारताचें संरक्षण-संवर्धन केलें आहे. गेल्या पांच हजार वर्षांचा तो जगावेगळा मूल्यवान् वारसा उपेक्षून आपण भविष्याची वाटचाल समर्थपणें करूं शकणार नाहीं. तशी अपेक्षा करणें हें आत्मघातकीपणाचें ठरेल.

... या भमींत भौगोलिक आणि सामाजिक विविधता असूनहि एकात्मतेचा एक दृढ तंतुहि त्या विविधतेंत अनुस्यूत आहे. औपनिषदिक ऋषींपासून विवेकानंद-अरविंदांपर्यंत अनन्त महापुरुषांनीं या भूमीच्या समग्रतेचें परिपोषण केलें आहे. कैलासापासून कन्याकुमारीपर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंत या खंडप्राय भूमींत जें रुजलें, अंकुरलें नि फुललें, त्याच्या सुगंधानें साऱ्या मानवतेचें हृदय दरवळून जावें, अशी त्याची आंतरिक प्रेरणा आहे. ती संस्कृतीची फुलवेल कोमेजूं न देतां जोपासली पाहिजे आणि तिच्या सुगंधी फुलांनीं भरतभूमीचा माथा सतत विशोभित केला पाहिजे ...

... धर्म, इतिहास आणि कला या त्रिवेणीचीं प्रयागतीर्थें बनलेलीं हीं चाळीस केंद्रें आणि त्यानंतर इतरहि अनेक ...

— आनंदयात्री

**१. अमरनाथ, २. कैलास-मानस, ३. बदरी-केदार, ४. हरिद्वार, ५. पशुपतिनाथ, ६. अमृतसर, ७. हस्तिनापूर, ८. मथुरा-वृंदावन, ९. काशी, १०. प्रयाग, ११. अयोध्या, १२. चित्रकूट, १३. गया, १४. नालंदा, १४. राजगृह, १६. नवद्वीप, १७. कामाख्या, १८. जगन्नाथपुरी, १९. कोणार्क, २०. भुवनेश्वर, २१. द्वारका, २२. सोमनाथ, २३. गिरनार, २४. अबू, २५. उज्जयिनी, २६. माहिष्मती, २७. अमरकंटक, २८. श्रीशैलम्, २९. हंपी-विरूपाक्ष, ३०. उडिपी, ३१. गोकर्ण-महाबळेश्वर, ३२. तिरुपति, ३३. श्रवणबेळगोळ, ३४. कांचीपुरम्, ३५. अरुणाचलम्, ३६. चिदम्बरम्, ३७. श्रीरंगम्, ३८. मदुरा, ३९. रामेश्वर, ४०. कन्याकुमारी.**